दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार




• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ • अंक-७९ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# लाडक्या बहिणींना फडणवीस सरकारचा मोठा दिलासा:ई-केवायसीला ३० एप्रिलपर्यंत संधी

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील महिलांसाठी महत्त्वाची असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या योजनेतील ई-केवायसी दुरुस्तीसाठी मुदत वाढवण्यात आल्याची घोषणा केली आहे. यापूर्वी ही अंतिम तारीख ३१ मार्चपर्यंत होती, मात्र आता ती थेट ३० एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांना कागदपत्रे आणि माहिती दुरुस्त करण्यासाठी आणखी एक महिना मिळाला आहे.या निर्णयामागे राज्य सरकारची स्पष्ट भूमिका असल्याचेही तटकरे यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनुसार ही मुदतवाढ देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील जास्तीत जास्त महिलांना योजनेचा लाभ मिळावा आणि तांत्रिक कारणांमुळे कोणीही वंचित राहू नये, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. या योजनेमुळे अनेक कुटुंबांना आधार मिळत असून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळत आहे. मात्र ई-केवायसी प्रक्रियेत काही महिलांकडून त्रुटी राहिल्यामुळे त्यांना अडचणी येत होत्या. त्यामुळे ही मुदतवाढ शेवटची संधी, असल्याचेही तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.




# ठाणे महानगरपालिकेने केली ८७८ कोटींची विक्रमी मालमत्ता कर वसुली

## महापौर व महापालिका आयुक्तांनी मानले करदात्यांचे आभार

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महापालिकेमार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये ८७८.३७ कोटी रुपये इतका विक्रमी मालमत्ता कर संकलित करण्यात आला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता ९१५ कोटी इतके अर्थसंकल्पीय उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले होते. या उद्दिष्टाच्या ९६ टक्के एवढा मालमत्ता कर संकलीत करण्यात महापालिकेस यश मिळाले आले. ठाणे महापालिका क्षेत्रातील करदात्यांनी दिलेल्या या प्रतिसादाबद्दल महापौर शर्मिला पिंपळोलकर, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी करदात्यांचे आभार मानले आहेत. मागील सन २०२४-२५ मध्ये रु. ८१० कोटी कर संकलन झाले होते. त्याच्या तुलनेत यावर्षी रु. ६८.३७ कोटी अधिक महसूल प्राप्त झाला आहे. मालमत्ता कर संकलनात वाढ होण्यासाठी महापालिकेमार्फत विविध प्रभावी उपाययोजना राबविण्यात आल्या ऑनलाईन तसेच सर्व संकलन केंद्रांवर कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. धनादेश, डीडी, डेबिट/क्रेडिट कार्डद्वारे भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान सुट्टीच्या दिवशीही संकलन केंद्र सुरू ठेवण्यात आली होती. ऑटो रिक्षाद्वारे जनजागृती, गृहनिर्माण संस्थांमध्ये मोबाईल व्हॅन कॅम्प, एसएमएसद्वारे कर भरण्याचे स्मरण देण्यात आले. त्याचबरोबर, ज्या करदात्यांनी विहीत मुदतीत कर भरलेला नाही, अशा करदात्यांच्या मालमत्तेवर वॉरंट बजावून जप्ती, सेवा खंडीत करणे व इतर कारवाई करण्यात आली. उथळसर - ५२.५८, नौपाडा-कोपरी - ९७.०६, कळवा - २७.७६, मुंब्रा - ४५.०३, दिवा - ४३.४३, वागळे इस्टेट - ३५.२७, लोकमान्य सावरकरनगर - ३१.७१, वर्तकनगर - १२०.४०, माजिवडा-मानपाडा - २३६.५१, मुख्यालय व इतर - १८८.६२ याप्रमाणे एकूण : ८७८.३७ कोटी कर जमा झाला.




# शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार प्रदान

**उरण । प्रतिनिधी**

विष्णुदास भावे नाट्यगृह सभागृह वाशी नवी मुंबई येथे सारथी सेवा संस्था द्वारे सेंट मेरीज जे. एन. पी. शाळेचे शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार हा रस्ता सुरक्षा अभियान, गणपती विसर्जन व इलेक्शन ड्युटी साठी विशेष पोलीस अधिकारी म्हणून ड्युटी केल्याबद्दल, अपघातग्रस्तांना मदत केल्याबद्दल, दरवर्षी रक्तदान केल्याबद्दल, शालेय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्च पास्ट संचलनाबरोबरच वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण दल याबद्दल माहिती दिल्याबद्दल देण्यात आला. या विशिष्ट पुरस्काराबद्दल त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक राजेश अल्फोंस यांनी देखील कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजसेवेचे कार्य करत असताना त्यांना जी प्रेरणा मिळाली ती त्यांचे गुरुवर्य विलास पाटील यांच्याकडून.विलास पाटील हे त्यांचे आदर्श आहेत.समाजाची कोणत्या ना कोणत्या माध्यमातून सेवा करण्याचा हरीश धर्मा भोंडकर नेहमी प्रयत्न करत असतात व इतरांनाही प्रेरित करतात.त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक ठिकाणी त्यांचा मानसन्मान सुद्धा झाला आहे.शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# ठाणे पोलिसांकडून अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रसाठ्यासह सराईत अटकेत

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे पोलिसांकडून अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रसाठ्यासह सराईत गुन्हेगारास अटक करण्यात यश आले आहे. गुन्हे शाखा, युनिट-३, कल्याणकडुन अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करण्याचे अनुषांगाने रेकॉर्डवरील गुन्हेगार यांचेवर बारकाईने लक्ष ठेवुन असताना गुन्हे शाखा, घटक ३, कल्याणचे सहा. पोलीस निरीक्षक, सर्जेराव पाटील यांना मिळालेल्या गोपनिय बातमीवरून सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष, धंदा कंन्स्ट्रक्शन, रा. एकविरा बंगला, श्री धनलक्ष्मी अपार्टमेंट बिल्डींग नंबर ५, मोती मिठाईवाल्याचे मागे, दावडी डोंबिवली पुर्व यास सापळा लावुन शिताफिने ताब्यात घेवुन त्याचे राहते घरी छापा कारवाई करण्यात आली. त्याचे राहते घर श्री धनलक्ष्मी अपार्टमेंट मधील बिल्डींग नंबर ५ चे पाचवे माळयाचे टेरेसवरील चप्पल स्टॅडचे पाठीमागील बाजुस लिफ्टचे डकमधुन प्रवेश करण्यासाठी असलेल्या जागेतील गुप्त बेडरूम मधील कपाटात एक विशिष्ट कप्पा बनवलेल्या जागेत ठेवलेले ०३ देशी बनावटीचे पिस्टल, ०१ सिक्सर रिव्हॉल्वर, ०७ गावठी कट्टे, ०१ रिकामी मॅगझिन, २ एअर गन, ४०५ जिवंत काडतुसे, जिवत १६७ छरे, २ धारदार लोखंडी तलवार, ३ लोखंडी कोयते, ०१ लोखंडी धारदार सुरा, ०१ बटन चाकु, ०२ लोखंडी रॉड तसेच ०२ मोबाईल फोन व तसेच ३,५२,०००/- रू किमतीच्या भारतीय चलनातील जुन्या व नवीन बनावट नोटा असा एकुन १२,२१,०००/- रूपये (बारा लाख एकवीस हजार रूपये) एकुन किमंतीची अग्निशस्त्रे, घातक हत्यारे व मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला आहे.सदर प्रकरणी इसम नामे सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष याचेवर मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २८३/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३,४,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयात सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष यास अटक करण्यात आली असुन त्यावर एकूण १३ गुन्ह्यांची नोंद असून तो सध्या पोलीस कोठडी रिमांडमध्ये आहे. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, युनिट-३, कल्याणचे सहायक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील हे करीत आहेत.



दैनिक लोकांकीत



# बुलडाणा अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी पुणे–बुडीत निघते काय ?

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे येथिल प्रभात रोड येथिल बुलडाणा अर्बन को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मधील कारभार गेल्या दोन वर्षा पासून प्रकाश झोतात येत आहे अनेक प्रकरणा मुळे ही सोसायटी प्रकाश झोतात येत आहे प्रभात रोड येथिल या सोसायटी मधील एका कर्मचा-याने लॉकर मधून तब्बल अडीच कोटींचे सोने आणि हि-याचे दागिने एका खातेदारांशी संगतमत करून लंपास केले आहे यामुळे आणि येथिल सरव्यवस्थापक शिरिष देशपांडे यांनी प्रचंड प्रमाणात बॅंकेला चूना लावण्याचा प्रकार पुढे येत असल्या कारणाने बुलडाणा अर्बन को- ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी प्रभात रोड पुणे, बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा जयपूर कोथळी प्रकरण,बीड जिल्ह्यातील धारूर येथिल प्रकरण,वाशिम जिल्ह्यातील मानोरा येथिल प्रकरण,हिंगोली जिल्ह्यातील कळपुरी येथिल ८० लाखांचा घोटाळा,पुणे येथिल मॉडेल कॉलनीतील जैन मंदिर आणि वसतिगृहाशी संबंधीत २० कोटी रूपयांचे गहाण प्रकरण अशा कारणाने ही सोसायटी बुडीत निघते काय हा प्रश्न खातेदारा मध्ये येत आहे हे प्रकरण असतांनाच बुलडाणा अर्बन क्रेडिट को- ऑपरेटिव्ह बॅंक प्रभात रोड मूख्य शाखेत मधील प्रकार पुढे येत आहे बॅंकेचे कर्मचारी बाळासाहेब तुपारे याने खातेदार अजय पाटील यांच्या सोबत संगनमत करून दोन ग्राहकांच्या लॉकर मधून दोन कोटी पन्नास लाख रूपयांचे सोने व हिरे दागिने चोरल्या बाबत प्रकार पुढे येत आहे पहिली घटना २० फेब्रुवारीची आणि दूसरी घटना आठ दिवसा नंतरची लॉकर प्रभारी सविता राठी यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी नूसार अजय पाटील हा बाळासाहेब तुपारे यांचा मित्र अजय पाटील यांचे प्रभात रोड शाखेत खाते आहे त्यानूसार तुपारे याने राठी यांना अजय पाटील यास लॉकर सुविधा देण्याची विनंती केली होती घटना ज्या वेळेस घडली त्या दिवशी बॅंकेचे अधिकारी स्नेहल तळेकर रजेवर होत्या यांचा फायदा घेत तुपारे याने मास्टर कीच्या साहाय्याने आपला मित्र अजय पाटील यास बेकायदेशिर लॉकर उघडण्यास मदत केली तळेकर त्यांच्या ड्रॉवर मधून किल्ल्या घेऊन पाटील सह आत प्रवेश करत या दोघांनी लॉकर क्रमांक १२० आणि १८८ उघडत लॉकर क्रमांक मधून सुमारे ३९ तोळे सोने तर लॉकर क्रमांक १८८ मधील ३० तोळे सोने ,हिरे,रोख रक्कम दोन्ही मधील रोख रक्कम मिळून एकूण दोन कोटी पन्नास लाख रूपयांचा ऐवज चोरीला पोलिसांत तक्रार दिल्या नंतर बॅंकेतील सीसीटिव्ही फुटेज तपासल्या नंतर तुपाचे आणि पाटील यांना अटक केली पोलिस निरिक्षक गिरीशा निंबाळकर पुढील तपास करत आहे या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१६(५),३०५,३१८(४),६१(२) आणि ३(५०) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे बुलडाणा अर्बन क्रेडिट को- ऑपरेटिव्ह बॅंक यांची मुख्य कार्यालय बुलडाणा येथे कारंजा चौकात आहे यात अनेक प्रकरणात मुख्यशाखेसह



ईतर ठिकाणच्याही कारभारावर प्रश्न चिन्ह येत आहे

**अनेक घोटाळ्यात बॅंक गाजत आहे**

१) बुलडाणा अर्बन को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची प्रभात रोड ,सदाशिव पेठ , कोथरूड,मार्केट यार्ड, चिंचवड,औंध यांच्या येथे शाखा आहे मुख्य कार्यालय प्रभात रोडवर आहे ईतर राज्यात चार ठिकाणी शाखा अशा एकूण ४६७ शाखा कार्यरत सहा महिन्या पूर्वी मॉडेल कॉलनी जैन मंदीर आणि वसतिगृह संबंधीत २० कोटी रूपयांचे प्रकरण

२ ) मुख्य शाखा प्रभात रोड पुणे व्यवस्थापक संचालकांनी केलेला प्रकार

३ ) जालना येथिल बदनापूर याच शाखेचा शिपायी प्रताप जाधव याने राजीनामा पत्र आणि शाखाधिकारी यांच्या समोर किटकनाशक प्राशन करून आत्महत्यांचे प्रकरण

४ ) बुलडाणा अर्बन क्रेडिट को- ऑपरेटिव्ह बॅंकेचा प्रकार पाहता आमदार संतोष बांगर यांचा बुलडाणा येथिल आमदार संजय गायकवाड यांना फोन

५ ) बीड जिल्ह्यातील धारूर तालूक्यातील ठेविदार यांचे प्रकरण

६ ) बुलडाणा अर्बन को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची हिंगोली जिल्ह्यातील कळमपुरी शाखेतील शाखा व्यवस्थापक आणि दोन साथीदारांनी ७० ते ८० लाखांची रक्कम परस्पर काढण्याचे प्रकरण

७ ) मानोरा जिल्हा वाशिम बुलडाणा अर्बन को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या धान्य गोडाऊन मधून शेतक-याचे सोयाबिन परस्पर कर्मचा-याने विकले हे प्रकरण कोर्टात पर्यंत गेले होते

८ ) बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा तालूक्यातील जयपूर कोथळी येथिल सोसायटीत ठेवलेले सोने बॅंकेच्या व्यवस्थापकांनी परस्पर विक्री प्रकरण

९ ) १९९८ ते २००६ मध्ये बुलडाणा अर्बन को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी बुलडाणा मुख्य शाखेत फार मोठा गैरव्यवहार झाल्या बुलडाणा येथिल एका दैनिकाने प्रकरण गाजवले होते तो प्रकार

१० ) बुलडाणा अर्बन को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मुख्य कार्यालय प्रभात रोड यांचे व्यवस्थापकीय संचालक आणि ईतर दोन साथीदार यांनी फार मोठा घोटाळा करत राजीनामा का दिला हे प्रकरण

(या प्रकरणा बाबत सविस्तर वृत्त पुराव्यासह पुढील भागात पाहा )

# वॉलमार्ट वृद्धीचा एमएसएमईंना मोफत डिजिटल प्रशिक्षण आणि व्यावसायिक साधनांचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र उद्योग संचालनालयाशी सहयोग

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

वॉलमार्ट वृद्धीने आज महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयाबरोबर त्यांच्या उपक्रम भागीदार आयडियाज टू इम्पॅक्ट फाउंडेशनच्या माध्यमातून सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

ही भागीदारी संपूर्ण महाराष्ट्रात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) वाढीच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. डिजिटल शिक्षण सुविधा आणि व्यवसाय साधने देऊन एमएसएमईंना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विस्तार, व्याप्ती वाढवण्यास आणि प्रगती करण्यास मदत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मुंबई येथे एक एप्रिल रोजी या करारावर स्वाक्षरी करण्यात आली असून भारतातील एक लाख एमएसएमईंना २०२८ पर्यंत सक्षम करण्याच्या वॉलमार्ट वृद्धीच्या मोहिमेतील हा महत्त्वाचा टप्पा आहे.



या सहकार्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एमएसएमईंना त्यांची उद्योग क्षमता बळकट करण्यासाठी आणि स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी मोफत वॉलमार्ट वृद्धी प्रशिक्षण आणि डिजिटल साधने उपलब्ध होतील. वॉलमार्ट वृध्दीच्या प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीच्या प्रयत्नांचा राज्यभरातील उद्योजकांना फायदा देण्यासाठी उद्योग संचालनालय आपल्या जिल्हा उद्योग केंद्रांद्वारे (डीआयसी) या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवेल. हा उपक्रम वस्त्रोद्योग, हस्तकला, कृषी प्रक्रिया, चामड्याच्या वस्तू, तयार कपडे, रेशीम, फर्निचर, दागिने, मिठाई आणि पितळी धातू उत्पादने अशा प्रमुख उद्योगांवर लक्ष केंद्रित करेल. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये याची सुरुवात होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन म्हणाले की, एमएसएमई ही महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीमागील प्रेरक शक्ती आहे, जी औद्योगिक वाढ, रोजगार निर्मिती आणि आपल्या राज्याची व्याख्या करणाऱ्या उद्योजकतेच्या भावनेत लक्षणीय योगदान देते. भविष्यासाठी सज्ज एमएसएमई वातावरणाला चालना देण्यासाठी आणि छोट्या व्यवसायांना आजच्या बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांनी सुसज्ज करण्यासाठी वॉलमार्ट वृद्धीबरोबरचे आमचे सहकार्य महाराष्ट्र सरकारची वचनबद्धता प्रतिबिंबित करते.वॉलमार्टच्या स्त्रोत आणि खरेदी विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष जेसन फ्रेमस्टॅड म्हणाले, एमएसएमई क्षेत्र भारताच्या आर्थिक वाढीच्या सर्वात मजबूत प्रेरकांपैकी एक आहे. ते उद्योजकांच्या कल्पकता आणि चिवटपणाने चालते. या भागीदारीच्या माध्यमातून वॉलमार्ट वृद्धी एमएसएमईंना त्यांची क्षमता उलगडण्यासाठी सक्षम करत आहे. डिजिटल साधने, व्यवसाय प्रशिक्षण आणि बाजारपेठेत प्रवेश देऊन करून, हा कार्यक्रम स्थानिक उद्योगांना त्यांची स्पर्धात्मकता वाढवण्यास आणि स्थानिक प्रभावाचे राष्ट्रीय आणि जागतिक संधींमध्ये रूपांतर करण्यास सक्षम करतो.

महाराष्ट्रभरातील उद्योजक त्यांच्या व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी, डिजिटल क्षमता बळकट करण्यासाठी आणि व्यापक बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी वॉलमार्ट वृद्धीचा लाभ घेत आहेत. राज्यातील यशोगाथा या कार्यक्रमाचा मूर्त परिणाम अधोरेखित करतात. उदाहरणार्थ, ऑनलाईन बेचो या वेगाने वाढणाऱ्या डिजिटल रिटेल कंपनीचे सह-संस्थापक हर्षल गडा यांनी वॉलमार्ट वृद्धीचा वापर ब्रँड पोझिशनिंग सुधारण्यासाठी, पुरवठा साखळी व्यवस्थित करण्यासाठी आणि डिजिटल रिटेल ऑपरेशन्सचे प्रमाण वाढवण्यासाठी केला. वैयक्तिकृत मार्गदर्शनामुळे साधनसामुग्री योग्य प्रकारे वापरण्यास आणि उत्पादन विस्तार करण्यास मदत झाली. त्यामुळे कंपनीला जागतिक बाजारपेठेत दर्जेदार भारतीय उत्पादने आणता आली.

अनिंदिता चौधरी यांच्या नेतृत्वाखालील इकोसर्व्ह इंडिया हा एक शाश्वत, महिलांच्या नेतृत्वाखालील उपक्रम आहे, जो नैसर्गिक धागे आणि जबाबदारीने मिळवलेल्या सामग्रीपासून पर्यावरणास अनुकूल हस्तकला उत्पादने तयार करतो. व्यवसायांनी निसर्ग आपल्याला जितके देतो तेवढेच परत द्यावे या विश्वासावर आधारित असलेल्या इकोसर्व्ह इंडियाला वॉलमार्ट वृद्धीच्या पाठिंब्याचा फायदा झाला. या कार्यक्रमाने कंपनीची डिजिटल चॅनेल, उत्पादन स्थिती आणि कार्यान्वयन कार्यक्षमता यांची समज वाढवली. त्यामुळे त्यांच्या सुमारे ९० टक्के महिला असलेल्या कारागीरांना मोठ्या बाजारपेठेत आत्मविश्वासाने पोहोचता आले.

वॉलमार्ट वृद्धी २०१९ मध्ये सुरू झालेला एक पुरवठादार विकास कार्यक्रम आहे. तो भारतातील एमएसएमईंना आधुनिकीकरण, प्रमाण आणि त्यांच्या देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी सक्षम करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. वॉलमार्टचे जागतिक पुरवठा साखळीतील कौशल्य आणि फ्लिपकार्टची देशव्यापी ई-कॉमर्स पोहोच एकत्र आणून हा कार्यक्रम एमएसएमईना वित्त, मार्केटिंग, मनुष्यबळ व्यवस्थापन, लॉजिस्टिक्स आणि बरेच काही यावर विनामूल्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि व्यवसाय सल्ला देतो. वॉलमार्ट वृद्धीने आपल्या स्थापनेपासून भारतातील ७० हजारहून अधिक एमएसएमईंना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले आहे.वाढीच्या संधी मिळवण्यासाठी एमएसएमई वॉलमार्ट वृद्धी उपक्रमासाठी येथे नोंदणी करू शकतात.

# शिवरायांचे विचार जगणारा नेता महेंद्रशेठ घरत; रोहे तालुक्यातील ग्रामस्थांचे मत

## अथांग समुद्रात लाटांशी झुंज देणारा कोळी समाज–महेंद्रशेठ घरत

**उलवे । प्रतिनिधी**

महेंद्रशेठ घरत सध्या रायगड जिल्हाध्यक्ष या नात्याने रायगडच्या दौऱ्यावर आहेत. संघटन सृजन अभियानांतर्गत हा दौरा सुरू आहे. मंगळवारी (ता. ३१ )त्यांनी पेण, रोहे, माणगाव या ठिकाणी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सोबत काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या रागिणी नायक आहेत. त्या रायगड जिल्हा निरीक्षक आहेत. त्यामुळे त्यांनी प्रत्येक तालुकानिहाय कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची मते आजमावून घेतली. दरम्यान, महेंद्रशेठ घरत यांनी पाली येथील बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. रायगड जिल्ह्यातील दुर्गम भागातील अनेक मंदिरांना महेंद्रशेठ घरत यांनी सढळ हस्ते देणग्या दिलेल्या आहेत. त्यामुळे रोहे तालुक्यात त्यांचे पदार्पण होताच तेथील देवकान्हे आणि दिव येथील मंदिरात ते गेले. त्यावेळी तेथील ग्रामस्थांनी महेंद्रशेठ घरत यांचे जोरदार स्वागत केले. दिव येथील कोळी समाजाने हनुमान मंदिर बांधले आहे. या मंदिरासाठी महेंद्रशेठ घरत यांनी भरघोस देणगी दिली आहे. त्यामुळे

महेंद्रशेठ घरत मंदिरात येणार याची चाहूल लागताच संपूर्ण कोळी समाज त्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाला होता. 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार जगणारा कलियुगातील एकमेव नेता महेंद्रशेठ घरत!' असे यावेळी रोहे तालुक्यातील ग्रामस्थांनी बोलून दाखवले. दिव येथील सुंदर हनुमान मंदिर पाहून महेंद्रशेठ घरत यांना मनस्वी आनंद झाला. आपण योग्य ठिकाणी देणगी दिली आणि ग्रामस्थांनी तिचा योग्य वापर केला आणि देखणे मंदिर बांधले याचे समाधान महेंद्रशेठ घरत यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. यावेळी दिव ग्रामस्थांनी महेंद्रशेठ घरत यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, कोळी समाजावर माझे नितांत प्रेम आहे. अथांग समुद्रात लाटांशी झुंज देणारा कोळी समाज कौतुकास पात्र आहे. हा समाज अहोरात्र कष्ट करून सन्मानाने जगतो. देवावर अपार श्रद्धा ठेवून भक्तिभावाने उत्सव साजरा करून गावात एकोपा ठेवतो. त्यामुळे दिव येथील कोळी समाजाने सुंदर हनुमान मंदिर बांधून गावची शान वाढवली आहे. त्यामुळे दिव ग्रामस्थांचे अभिनंदन!

यावेळी दिव येथील ग्रामपंचायत सदस्य आणि हनुमान मंदिर अध्यक्ष सत्यवान तांडेल, उपाध्यक्ष महादेव तांडेल, सागर हवालदार, शांताराम हवालदार, महेंद्र कठोरे, चंद्रकांत हवालदार आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## माता रमाई आंबेडकर नगर घाटकोपर पूर्व मुंबई येथील आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ रिप.पँथर नेते डॉ. हरिष अहिरे यांचे निधन

**मुंबई । प्रतिनिधी**

घाटकोपर पुर्व माता रमाई आंबेडकर नगरातील ज्येष्ठ पँथर – रिपब्लिकन नेते डॉ. हरिष अहिरे ( ८० वर्षे ) यांचे बुधवार,दिनांक.१ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ३ वाजता ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा दुपारी ३ वाजता सोना नर्सिंग होम येथील निवासस्थाना पासून निघाली अशी माहिति त्यांच्या कन्या डॉ. पल्लवी अहिरे यांनी दिली. डॉ. अहिरे यांचे 'भारतीय दलित पँथर' आणि 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' तद्वतच आंबेडकरी विचारांच्या सामाजिक चळवळीत मोठे योगदान राहिले आहे. 'घाटकोपर येथील (रमाबाई नगर ) हत्याकांड' हे त्यांचे पुस्तक लक्षवेधी ठरले होते. आंबेडकरी




चळवळीतील लढाऊ नेते, कार्यकर्ते आणि लेखक म्हणून ते परिचित राहिले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी अनेक गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरवली आहे. विशेषतः कोरोना महामारीच्या कालावधीत कोरोनाग्रस्त लोकांना त्यांनी विशेष सहाय्य केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली आणि एक मुलगा, बंधू ज्येष्ठ साहित्यिक प्रा. गंगाधर अहिरे असा परिवार आहे.

## पोलीस भरती प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगरातील SRPF गट १४ मध्ये उमेदवारांसाठी माणुसकीचा स्पर्श

**संतोष पडवळ । ठाणे**

सध्या राज्यभर सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगर येथील SRPF गट क्रमांक १४ मध्ये घडणारे चित्र हे केवळ भरती प्रक्रियेपुरते मर्यादित न राहता, एक जिव्हाळ्याचा, माणुसकीचा आणि संवेदनशीलतेचा आदर्श ठरत आहे. या भरतीचे नेतृत्व करणारे डीसीपी तथा कमांडंट विक्रम साळी यांनी संपूर्ण प्रक्रियेला केवळ प्रशासनिक चौकटीत न ठेवता, उमेदवार हेच केंद्रबिंदू मानत एक वेगळीच ऊब दिली आहे. भरतीसाठी दूरदूरवरून आलेल्या युवक–युवतींच्या डोळ्यांत स्वप्नं आहेत, आशा



आहेत आणि त्या स्वप्नांना आधार देणारे हे नियोजन आहे. उमेदवारांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून केलेली सूक्ष्म तयारी, वैद्यकीय तपासणीतील पारदर्शकता, ग्राउंडवरील शिस्तबद्ध पण मानवी स्पर्श असलेले व्यवस्थापन – हे सर्व पाहता ही भरती केवळ प्रक्रिया न राहता एक अनुभव बनली आहे.विशेष म्हणजे येथे अधिकारी आणि उमेदवार यांच्यातील नातं हे केवळ औपचारिक न राहता संवादाने, विश्वासाने आणि समजुतीने बांधलेले दिसते. उमेदवारांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान, त्यांच्या शब्दांतून व्यक्त होणारी कृतज्ञता – हेच या उपक्रमाचे खरे यश आहे.सोशल मीडियावरही या उपक्रमाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत असून, अनेक जण मनापासून कौतुक करत आहेत. काही ठिकाणी तर उमेदवारांसाठी पिण्याचे पाणी, अल्पोपहार, अन्न व्यवस्था करण्यासाठी नागरिक स्वतःहून पुढे येत आहेत. ही केवळ भरती नाही, तर एक सामूहिक भावनेने उभा राहिलेला मानवतेचा उत्सव असल्याचे चित्र आहे. आजच्या यांत्रिक युगात प्रशासनात माणुसकीची अशी उब क्वचितच पाहायला मिळते. त्यामुळेच SRPF गट १४ मधील ही भरती प्रक्रिया संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे – जिथे नियमांसोबतच माणुसकीही तितकीच महत्त्वाची आहे.

# कोकण विभागीय आयुक्तपदी रुबल अग्रवाल विराजमान

## प्र.आयुक्त सिद्धराम सालीमठ यांच्याकडून स्वीकारला पदभार

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

प्रशासकीय क्षेत्रातील आपल्या धडाकेबाज कार्यशैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या ज्येष्ठ सनदी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी सोमवार, ३० मार्च २०२६ रोजी कोकण विभागीय आयुक्त पदाची सूत्रे स्वीकारली आहेत. त्यांनी प्रभारी विभागीय आयुक्त सिद्धराम सालीमठ यांच्याकडून या पदाचा कार्यभार अधिकृतपणे स्वीकारला.२००८ च्या बॅचच्या आयएएस (IAS) अधिकारी असलेल्या रुबल अग्रवाल यांनी आपल्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर काम करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. यापूर्वी त्यांनी सोलापूर येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून आपल्या सेवेला सुरुवात केली होती. त्यानंतर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आणि अहमदनगर तसेच जळगाव येथे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी यशस्वी कामकाज पाहिले आहे.

श्रीमती रुबल अग्रवाल या शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या पहिल्या महिला मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. त्यांच्या काळात साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे नियोजन अत्यंत भव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.त्या पुणे महापालिकेत अतिरिक्त महापालिका आयुक्त म्हणून कार्यरत असताना त्यांनी कोविड–२०१९ च्या भीषण संकटाचे व्यवस्थापन अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या या कामगिरीची दखल राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली होती.

यापूर्वी त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या (ICDS) आयुक्त म्हणून राज्यातील १ लाख १० हजार अंगणवाड्यांचे जाळे सक्षमपणे हाताळले आहे.कोकण विभागीय आयुक्त पदावर येण्यापूर्वी त्या महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून



कार्यरत होत्या.श्रीमती रुबल अग्रवाल यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल त्यांना आतापर्यंत उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार (महाराष्ट्र शासन, २०१६–१७), महात्मा गांधी शांतता पुरस्कार (जळगावमध्ये कायदा व सुव्यवस्था राखल्याबद्दल), अरुण बोंगीरवार सार्वजनिक सेवा उत्कृष्टता पुरस्कार (पुणे शहरातील कोविड नियंत्रणासाठी), स्मार्ट सिटी डिजिटल पेमेंट आणि ई–गव्हर्नन्स पुरस्कार अशा अनेक प्रतिष्ठित महत्त्वाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

कोकण विभाग हा भौगोलिक आणि प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विभाग मानला जातो. या विभागातील महसूल प्रशासन, पायाभूत सुविधांचे प्रकल्प आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत रुबल अग्रवाल यांच्या दांडग्या अनुभवाचा मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विभागातील कामकाजाचा आढावा घेण्यास सुरुवात केली असून, जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याला आपले प्राधान्य असेल, असे म्हणाल्या.

# आरपीआय आठवले गट च्या शिष्ट मंडळाने घेतली भोंदू बाबाची दखल

## राष्ट्रीय अध्यक्ष दयाल बहादुरे महाराष्ट्र सचिव बाळकृष्ण गायकवाड यांनी भोंदू बाबाच्या जन्मगावची केली पाहणी

**नागपूर । प्रतिनिधी**





रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सचिव दयाल बहादुरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र सचिव बाळकृष्ण गायकवाड मामा ,विनोद थोरात महाराष्ट्र युवक उपाध्यक्ष, अदिवासी संघटनेचे अशोक,जयवंत शेलार,मीडिया शहरणामा चे प्रतिनिधी सागर सांगळे यांच्या सह भोंदूबाबा अशोक खरात यांचे जन्मगाव मु, काहंडाळवाडी ता. सिन्नर जिल्हा नासिक येथे भेट दिली. त्याचा जन्म १९६५ वर्षाचा आहे १० वी नापास झाल्यावर त्यांनी ते गाव सोडले ह्या गावात घेगडमल कुटुंब बौद्ध समाजाचे किरण,नितीन,आणि सचिन राहायला आहेत त्यांच्या घरी जाऊन माहिती घेतली. आणि मु,वावी ता.सिन्नर येथील नूतन विद्यालयात १० व्या वर्गा पर्यंत शिक्षण झाले त्या शाळेत भेट दिली १९८३ मध्ये तो ह्या शाळेत होता. मु.मिरगाव ता सिन्नर या ठिकाणी २०१० मध्ये अशोक खरात यांनी शिवाणीक संस्था स्थापन करून ईशानेश्वर मंदिर बांधले मंदिराला लागूनच आंब्याची बाग लावली आणि त्या ठिकाणीच स्वतःला राहण्यासाठी बंगला बांधला त्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली.

# उमरोली आदिवासी वाडीत मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत । जयेश जाधव**



अखंड पोलिस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली संघटनेच्या वतीने उमरोली आदिवासी वाडीत मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रुप ग्रामपंचायत मधील उमरोली आदिवासी वाडीमध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सर्वप्रथम संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या हस्ते महापुरुषांना हार घालून कार्यक्रम सुरू करण्यात आला.या आरोग्य शिबिरात डोळे तपासणी, बीपी,शुगर, ताप, गुढघे दुखी,वजन, व सामान्य चाचण्या आणि औषधे वाटप करण्यात आले.

या शिबिरात १५७ नागरिकांनी या आरोग्य शिबिरात सहभाग घेऊन आपल्या आजाराचे निदान करून घेतले. तसेच वाडीतील लहान मुलांना बिस्कीट आणि चॉकलेट खाऊ देण्यात आला.

यावेळी या कार्यक्रमात अ. पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली व हिंद (आरक्षी) पोलिस फ्रेंड असोसिएशन नवी दिल्ली संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री डॉ. ज्ञानेश्वर साळोखे, डॉक्टर विशाल बनसोडे, डॉक्टर समीक्षा संतोष भोईर, आयडीबीआय बँक असिस्टंट मॅनेजर निशांत म्हैसने,पोलिस पाटील गणपत वाघमारे, कार्याध्यक्ष सचिन लोंगले, नरेश लोंगले,राम वाघमारे, बाबू पवार, गणपत वाघमारे, शंकर मुकणे, सुनील जाधव, दत्तात्रेय वाघमारे, पांडुरंग मुकणे,तसेच गुड शेपट कॉन्व्हेन्ट शिक्षिका माधुरी साळोखे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

## संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार यांची नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांच्या मान्यतेने महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी आज महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची नवी प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली आहे. १२६ जणांच्या या कार्यकारिणीत खजिनदारपदी अनिकेत नवले व अक्षय जैन, संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार आणि प्रशासन सरचिटणीसपदी विवेक गावंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय तनवीर विद्रोही, प्रशांत ओगले, प्रथमेश अबनावे, कपिल ढोके, अनुराग भोयर, आमेर अब्दुल सलीम, दिप्तेश परब, आफरीन हुसेन यांची उपाध्यक्ष पदी तसेच ४४ सरचिटणीस आणि ७४ प्रदेश सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे.विशेष म्हणजे, या कार्यकारिणीत सर्वसामान्य कुटुंबातील आणि कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या युवक-युवतींना मोठ्या प्रमाणावर संधी देण्यात आली आहे. या कार्यकारिणीत तळागाळात काम करणाऱ्या आणि संघटनेसाठी सातत्याने झटणाऱ्या युवकांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण होणार आहे. या नव्या कार्यकारिणीमुळे युवकांमध्ये काँग्रेस पक्षाबद्दल आणि युवक काँग्रेसबद्दल आशादायी वातावरण निर्माण झाले असून, राज्यभरातून या निर्णयाचे स्वागत आणि कौतुक होत आहे. नव्या कार्यकारिणीतील पदाधिकारी काँग्रेस पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवतील व युवकांच्या प्रश्नांवर जोरदार आंदोलने करतील असा विश्वास युवक प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी व्यक्त केला आहे.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नवनियुक्त महानगर पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांचे अभिनंदन करताना म्युनिसिपल मजदूर संघाचे सरचिटणीस समाजभूषण प्रकाश कमळाकर जाधव ज्येष्ठ चिटणीस संजय कापसे, खजिनदार सुनील कांबळे, उपाध्यक्ष नितीन बाबुराव कांबळे, चिटणीस एस पी जाधव, विजय सागरे , नितीन चंद्रकांत कांबळे, जी उत्तर विभागाचे अध्यक्ष मनोज सागरे , रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे मायनॉरिटी सेल मुंबई प्रदेश अध्यक्ष सोहेल शेख, सरचिटणी अजगरभाई समाजसेवक अंबादास केदारे आदि पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने बुधवार दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी प्रत्यक्ष भेटून म्युनिसिपल मजदूर संघाचे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या वतीने अभिनंदन केले.

# 'मामाच्या गोव्याला जाऊया' चा मुहूर्त संपन्न 'स्ट्रगलर साला' नंतर विजू माने घेऊन येत आहेत नवीन धमाल चित्रपट

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या नव्या विषयांची आणि फ्रेश कंटेंटची लाट पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते विजू माने आता प्रेक्षकांसाठी मैत्री, मस्ती आणि आठवणींचा जल्लोष घेऊन येत आहेत. त्यांच्या आगामी 'मामाच्या गोव्याला जाऊया' या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. 'स्ट्रगलर साला' या गाजलेल्या सीरिजनंतर विजू माने पुन्हा एकदा तरुणाईच्या जवळचा विषय घेऊन येत आहेत. चित्रपटाच्या नावावरूनच गोव्याची ट्रिप, मित्रांची धमाल आणि नात्यांमधली मोकळीक यांचा भन्नाट मेळ यात अनुभवायला मिळणार, याची चाहूल लागते. फ्रेंडशिप डेच्या आठवड्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याने, तरुण प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाची नेमकी कथा आणि कलाकारांची फळी अद्याप गुप्त ठेवण्यात आली असली तरी, 'मामाच्या गोव्याला जाऊया' हे शीर्षकच प्रेक्षकांना आपल्या मित्रांच्या




ग्रुपची आठवण करून देणारं आहे. दिग्दर्शक विजू माने सांगतात, 'स्ट्रगलर साला'ला प्रेक्षकांनी दिलेलं प्रेम माझ्यासाठी खूप खास आहे. त्या सीरिजमधील मैत्री आणि मस्ती लोकांच्या मनाला भिडली. त्याच भावनेतून 'मामाच्या गोव्याला जाऊया' ही कल्पना आकाराला आली. या चित्रपटातून प्रेक्षकांना मनमुराद हसण्याचा, मित्रांसोबत घालवलेल्या क्षणांची आठवण करून देणारा आणि थोडासा नॉस्टॅल्जिक अनुभव देण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक मित्रांच्या ग्रुपमध्ये गोव्याला जाण्याचा प्लॅन केला जातो आणि तो फसतो, अशाच मित्रांची ही कहाणी आहे. हलक्याफुलक्या शैलीत सांगितलेली ही कथा प्रत्येकाला आपलीशी वाटेल. विजुमेनिया प्रायव्हेट (ओपीसी) प्रायव्हेट लिमिटेड निर्मित, विजू माने लिखित व दिग्दर्शित हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, 'मामाच्या गोव्याला जाऊया'च्या निमित्ताने पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर मैत्रीचा रंगतदार जल्लोष अनुभवायला मिळणार आहे. गोव्याच्या पार्श्वभूमीवर रंगणारी ही धमाल सफर प्रेक्षकांना केवळ हसवणारच नाही, तर आपल्या मित्रांसोबतच्या जुन्या आठवणींनाही उजाळा देणार, एवढं मात्र नक्की!

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)